## १०. सामूहिक शिक्षणांद्वारे योजनेचा प्रसार

आपत्ती व्यवस्थापन कृती योजना प्रभावीपणे अमंलात तिच्या तीन स्थरांवर प्रचार करण्याची आवश्यकता आहे.

केंद्र शासनाचे विभाग बहुभाषीक संस्था, सेनादल यांचे राज्यस्तरीय अधिकारी

नव्या मुंबईतील नगरपालिका प्रधिकरणे जिल्हा प्रधिकरणे शासकीय विभाग अशासकीय संघटना व इतर संस्था

सर्वसाधारण जनतेमध्ये जनप्रचार माध्यामाद्वारे

योजनेचा आशय सुनियोतिज आणि विषयनिष्ठ स्वरुपाचा जनजागृती कार्यक्रमाद्वारे समजवून सांगण्याची गरज आहे.

योजनेचा प्रचार करण्याची जवाबदारी आयुक्त यांच्याकडे विहित असेल आणि असा प्रचार आपत्तीव्यवस्थापनात सहभागी होणाऱ्या प्रेत्यक संस्थेद्वारे आयोजित जनजागृती कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात येईल.

जनजागृती कार्यक्रमाचा मोठया प्रमाणात प्रसार होण्यासाठी स्थनिक भाषेत प्रचार माध्यमांचा उपयोग करुन घेध्यात येईल.

जसे वृत्तपत्रे , दूरदर्शन, केबल, रेडिओ, साहित्य

शाळा महाविद्यालय व इतर संस्था यांच्यावर लक्ष केंद्रीत करण्यात येईल. त्याच बरोबर आयुक्त समाज आणि संबधित विभाग त्यांनी कार्यपध्दतीत कार्मचारी, साधनसाम्रगी आणि आपत्तीनंतरची सुव्यस्थतीकृती हयांची कायम सिध्दता ठेवावी व कृतीचा सराव प्रत्यक्षीते आयोजित करुन सुनिश्चित करतील.